# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: 9001:2015) (ISO/IEC 27001:2013)

४ था मजला, शासकीय तंत्र शिक्षण इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पुर्व), मुंबई- ४०० ०५१.

दू.क्र: २६४७१२५५/२६४७०९१६ फॅक्स : ९१-०२२-२६४७३९७९

Email: secretary@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.org.in

जा.क्र.मरातंशिमं/का -50/परिपत्रक/2020/3277 दिनांक :- 9 SEP 2020

## महत्वाचे परिपत्रक

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नीत सर्व

AICTE अभ्यासक्रम राबविणा-या संस्था.

**विषय — शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विषम सत्राकरीता लागणारे लॅब मॅन्युअल्स संकेतस्थळावर उपलब्ध करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत प्रत्येक सत्रात मंडळाशी संलग्नित असलेल्या AICTE संस्थेतील विद्यार्थांना प्रात्यक्षिकाच्या विषयासाठी शुल्क आकारुन लॅब मॅन्युअल्स वितरीत करण्यात येतात. परंतु कोव्हीड-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेली परिस्थिती व त्या अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकाकरीता लागणारे लॅबमॅन्युअल्स प्रिंट करुन संस्थाना वितरीत करणे शक्य झाले नाही.

सदर अनुषंगाने नियामक मंडळच्या ४९व्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार Online अध्यापन सुकर होण्याकरीता विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिका करिता मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या १,३,५ व्या सत्राचे तसेच D. Pharm च्या दोन्ही वर्षाचे तयार करण्यात आलेले लॅब मॅन्युअल्स मंडळाच्या संकेतस्थळावर या सत्राकरीता / वर्षाकरीता विनाशुल्क संस्थांना PDF format मध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहे. संस्थेने Lab Manual बाबत कोणतीही फी आकारु नये.

सदरचे Lab Manual विद्यार्थ्यांकरीता महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या संकेत स्थळावर डाव्या बाजुला असलेल्या Important Link या विभागात MSBTE's Lab Manuals या शिर्षकाखाली PDF Format मध्ये Download करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी सदर Lab Manual मधील फक्त Observation Table readings/Conclusion इत्यादी माहितीसाठीच्या प्रिंट काढुन त्या Journal मध्ये लावुन शैक्षणिक कार्य पुर्ण करावे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विषम सत्रा दरम्यान लॅब मॅन्युअल बाबत उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे संस्थास्तरावर कार्यवाही करण्याची जबाबदारी संस्थाप्रमुखांची आहे याची नोंद घ्यावी.

विरजाधव

(वि.र.जाधव )

प्र.सचिव

म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत. १. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय पुणे, औरंगाबाद, नागपूर व मुंबई.यांना माहीती व कार्यवाहीकरीता.

Z:\mup\All rbte letter & Circular\Paripatrak.doc